DR. D. Y. PATIL COLLEGE OF AGRICULTURAL ENGINEERING AND TECHNOLOGY

# NSS SPECIAL CAMP REPORT

# National Service Scheme

# 2025 - 2026

Not Me But You



A/P: Talsande, Tal: Hatkanangale, Dist/; Kolhapur-416 112
Email: principal.dypcaet@yahoo.in website: agri.dypgroup.edu.in Ph: 0230 247 9299

## Special Camp

**Theme:** ***"YOUTH FOR SUSTAINABLE DEVELOPMENT WITH SPECIAL ON WATERSHED MANAGEMENT & WASTELAND DEVELOPMENT "***

| | | |
|---|---|---|
| **1.** | **Duration** | **31st December 2025** to 6h **January 2026** |
| **2.** | **Place** | **Mauje Padali**<br>Tal- Hatkanangale, Dist – Kolhapur |
| **3.** | **Inauguration by** | **Mrs. Sujata Subhash Patil**<br>Sarpanch , Mauje Padali |
| **4.** | **Chief Guests** | **Dr. S. B. Patil**<br>Campus Director & Principal, Dr. D. Y. Patil College of Agricultural Engineering & Technology, Talsande.<br><br>**Er. P. D. Ukey**<br>Vice Principal & Academic Incharge , Dr. D. Y. Patil College of Agricultural Engineering & Technology, Talsande.<br><br>**Mr. P. S. Parit**<br>Gramsevak, Mauje Padali<br><br>**All members,** Gram Panchayat, Mauje Padali |
| **5.** | **NSS Coordinator** | **Mrs. Shweta A. Ingawale**<br>Asst. Prof., Dr. D. Y. Patil College of Agricultural Engineering & Technology, Talsande. |

## राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विशेष श्रमसंस्कार शिबिर २०२५-२६

### अहवाल: दिवस पहिला (आगमन, उद्घाटन आणि तांत्रिक सत्र)

**दिनांक: ३१/१२/२०२५**

**स्थळ: मौजे पाडळी**

*राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विशेष श्रमसंस्कार शिबिराचा पहिला दिवस अत्यंत उत्साहात आणि ज्ञानार्जनाने संपन्न झाला. सकाळी महाविद्यालयातील सर्व स्वयंसेवक पाडळी गावाकडे रवाना झाले. शिबिराच्या सुरुवातीलाच 'स्वच्छतेतून सेवा' हा मंत्र जपत हनुमान मंदिर परिसराची निवड करण्यात आली. स्वयंसेवकांनी एकत्रितपणे मंदिराचा गाभारा, सभा मंडप आणि आजूबाजूचा परिसर झाडून लख्ख केला, ज्यामुळे मंदिर परिसराला एक प्रसन्न स्वरूप प्राप्त झाले.*

*परिसर स्वच्छतेनंतर शिबिराचा अधिकृत उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद गावच्या सरपंच सौ. सुजाता सुभाष पाटील मॅडम यांनी भूषवले. कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात संत गाडगे महाराज आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी व्यासपीठावर ग्रामसेवक श्री. पी. एस. परीट सर, पाडळी बालविद्या मंदिराचे मुख्याध्यापक पाटील सर, स्थानिक ग्रंथालयाचे अध्यक्ष श्री. धनंजय पाटील सर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य पी. डी. उके सर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. वाय. व्ही. शेटे सर आणि चीफ कौन्सिलर डॉ. पी. एस. बंडगर सर अशा मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. सर्व स्वयंसेवकांनी यावेळी राष्ट्रीय सेवा योजना 'प्रतिज्ञा' घेतली आणि समाजसेवेचा संकल्प केला. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत त्यांना मार्गदर्शनाचे मोलाचे शब्द सांगितले.*

*दुपारच्या भोजनानंतर आणि अल्प विश्रांतीनंतर शिबिराचे पहिले बौद्धिक सत्र आयोजित करण्यात आले.*

*आजच्या काळातील वाढते सायबर गुन्हे लक्षात घेता. ग्रामस्थांना आणि स्वयंसेवकांना सतर्क करण्यासाठी 'सायबर सुरक्षा' (Cyber Security) या विषयावर व्याख्यान ठेवण्यात आले होते. यासाठी DYP-ATU मधील CS-AIML विभागाची तृतीय वर्षाची विद्यार्थिनी वैष्णवी पाटील हिने प्रमुख मार्गदर्शक म्हणून माहिती दिली. तिने अत्यंत सोप्या भाषेत ऑनलाईन फसवणूक टाळण्याचे उपाय, सोशल मीडिया वापरताना घ्यायची काळजी आणि सुरक्षित इंटरनेट व्यवहार कसे करावेत, याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. ग्रामस्थांनीही या सत्रात सहभागी होऊन आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. अशा प्रकारे, प्रत्यक्ष श्रमदान, भव्य उद्घाटन आणि तांत्रिक सत्राच्या माध्यमातून शिबिराचा पहिला दिवस यशस्वीरित्या संपन्न झाला.*




*राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत विशेष श्रमदान शिबिरासाठी मौजे पाडळी येथे प्रस्थान करतानाचा प्रसंग.*




प्रतिमापूजन व मान्यवरांचे स्वागत करतानाचा क्षण



गावातील आजूबाजूच्या परिसरातील स्वच्छता करतानाचा क्षण




सायबर सुरक्षा जनजागृती करतानाचा क्षण

## राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विशेष श्रमसंस्कार शिबिर २०२५-२६

**अहवाल**: *द्वितीय दिवस (***व्यसनमुक्ती व दुग्धउत्पादन जनजागृती** *)*

**दिनांक**: *०१/०१/२०२६*

**स्थळ**: *मौजे पाडळी*

*राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचा दुसरा दिवस सामाजिक प्रबोधन आणि तांत्रिक मार्गदर्शनाने अत्यंत फलदायी ठरला. आमच्या परंपरेनुसार, सर्वात आधी कार्यक्रम स्थळी म्हणजे मंदिरात सर्वांनी मिळून स्वच्छता केली. परिसर स्वच्छ केल्यानंतर सर्व स्वयंसेवकांनी शिबिराची शिस्त आणि सेवेची भावना जोपासण्यासाठी 'NSS प्रतिज्ञा' घेतली आणि अत्यंत उत्साहात 'NSS गीत' गायले.*

*यानंतर गावात* **'व्यसनमुक्ती'** *या विषयावर आधारित भव्य रॅली काढण्यात आली. घोषणांच्या माध्यमातून व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम सांगत स्वयंसेवकांनी संपूर्ण गावचे लक्ष वेधून घेतले. या रॅलीचाच एक भाग म्हणून गावात ठिकठिकाणी व्यसनमुक्तीवर आधारित पथनाट्य सादर करण्यात आले, ज्याला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.*

*दुपारच्या सत्रात ग्रामस्थांसाठी* **'दुग्धव्यवसाय आणि पशुपालन'** *या विषयावर तज्ज्ञ व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून* **प्रा. सुधीर सदाशिव सूर्यगंध** *सर (M.Sc. Agri in Animal Husbandry, KVK, Talsande) उपस्थित होते. सर हे SMS (विषय तज्ज्ञ - Subject Matter Specialist) म्हणून कार्यरत असून त्यांनी आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या आणि अफाट ज्ञानाच्या जोरावर अत्यंत साध्या आणि सोप्या भाषेत ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. अगदी प्राथमिक स्तरापासून दुग्धव्यवसाय कसा सुरू करावा आणि पशुपालन करताना कोणती शास्त्रीय काळजी घ्यावी, याची सविस्तर माहिती त्यांनी दिली.*

*याप्रसंगी महाविद्यालयाचे टेक्निकल ऑफिसर एस. एम. पाटील सर यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली. व्याख्यानाच्या शेवटी झालेल्या प्रश्नोत्तर सत्रात ग्रामस्थांनी विचारलेल्या शंकांचे सूर्यगंध सरांनी अत्यंत प्रभावीपणे निरसन केले.*

*भोजनानंतरच्या विश्रांतीनंतर स्वयंसेवकांनी प्रत्यक्ष ग्रामस्वच्छतेच्या कामाला सुरुवात केली. यामध्ये गावातील मुख्य चौक, ग्रामपंचायती समोरील मोकळी जागा आणि प्रमुख गल्ल्यांची सखोल स्वच्छता करण्यात आली. तसेच गावातील तुंबलेले नाले उपसून स्वच्छ करण्यात आले. अशा प्रकारे गीत, प्रतिज्ञा, प्रबोधन आणि प्रत्यक्ष श्रमदान अशा विविधांगी उपक्रमांनी शिबिराचा दुसरा दिवस यशस्वीरित्या संपन्न झाला.*




नशामुक्ती विरोधी मोहिमेंतर्गत पथनाट्य सादरीकरण




दुग्धव्यवसाय व पशुपालन याविषयावरती व्याख्यान देतानाचा क्षण




प्रमुख ठिकाणांची स्वच्छता करतानाचा क्षण

# राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर (२०२५-२६)

## **अहवाल:** तिसरा दिवस(कृषी मार्गदर्शन आणि शालेय उपक्रम)

**दिनांक:** ०२/०१/२०२६

**स्थळ:** मौजे पाडळी

*मौजे पाडळी येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराचा तिसरा दिवस हा 'ग्राम स्वच्छता' आणि 'शैक्षणिक प्रबोधन' या दोन मुख्य उद्दिष्टांवर आधारित होता. दिवसाची मंगलमय सुरुवात सर्व स्वयंसेवकांनी हनुमान मंदिर परिसराच्या श्रमदानाने केली. स्वच्छतेच्या या मोहिमेनंतर, शिबिराची शिस्त आणि सेवाभावी वृत्ती अधिक दृढ करण्यासाठी सर्व स्वयंसेवकांनी सामूहिकरीत्या 'NSS प्रतिज्ञा' ग्रहण केली. त्यानंतर 'हम होंगे कामयाब' या स्फूर्तीगीताच्या सामूहिक गायनाने संपूर्ण परिसरात एक नवी ऊर्जा आणि राष्ट्रभक्तीचे वातावरण निर्माण झाले.*

*सकाळच्या सत्रात, पर्यावरणाप्रती आपली जबाबदारी ओळखून 'वृक्ष संवर्धन आणि संगोपन' या विषयावर विशेष भर देण्यात आला. केवळ नवीन वृक्षारोपण करणे पुरेसे नसून, लावलेली झाडे जगवणे ही काळाची गरज आहे, हा संदेश देण्यासाठी गावातून एक भव्य जनजागृती फेरी काढण्यात आली. यावेळी स्वयंसेवकांनी मागील वर्षी लावण्यात आलेल्या झाडांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांचे संवर्धन केले, तसेच ग्रामस्थांना वृक्ष संगोपनाचे महत्त्व पटवून देत निसर्ग रक्षणाची शपथ दिली.*

*दुपारच्या सत्रात, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या उद्या होणाऱ्या जयंतीचे औचित्य साधून शैक्षणिक उपक्रम राबवण्यात आले. गावातील 'विकास विद्यामंदिर' येथे इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'निबंध लेखन स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. स्वयंसेवकांनी शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना सावित्रीबाईंच्या जीवनकार्याची माहिती दिली आणि स्पर्धेसाठी प्रोत्साहित केले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश मुलांच्या लेखन कौशल्याला वाव देणे आणि त्यांच्यात समाजसुधारकांचे विचार रुजवणे हा होता.*

*दिवसाच्या शेवटी, गावातील ठराविक भागांची पुनश्च स्वच्छता करून तिसऱ्या दिवसाच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. स्वयंसेवकांनी उद्याच्या नियोजनावर सविस्तर चर्चा केली आणि घोषणांच्या गजरात तिसऱ्या दिवसाची यशस्वी सांगता झाली. 'श्रमदानातून ग्रामविकास' हा मंत्र आजच्या कार्यातून खऱ्या अर्थाने अधोरेखित झाला.*



वृक्ष संवर्धन व संगोपन




*गावातील मुख्य ठिकाणी पथफेरी*






*सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन*

# राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर (२०२५-२६)

**अहवाल :** *दिवस चौथा (क्रांतीज्योती अभिवादन आणि सामाजिक बांधिलकी )*

**दिनांक**: *०३ जानेवारी २०२६*

**स्थळ:** *मौजे पाडळी*

*राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचा चौथा दिवस 'वैचारिक प्रबोधन' आणि 'सामाजिक सेवा' या दोन स्तरांवर पार पडला. दिवसाची सुरुवात महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती उत्सवाने झाली. त्यानंतर सर्व स्वयंसेवक पाडळी गावाकडे रवाना झाले. शिबिरस्थळी पोहोचताच हनुमान मंदिर परिसराची स्वच्छता करून, शिस्तीचे प्रतीक असलेली 'NSS प्रतिज्ञा' घेण्यात आली. ' सुबह सवेरे लेकर तेरा नाम प्रभु' या प्रार्थनेने सकाळच्या सत्रात एक शिस्तबद्ध सुरुवात झाली.*

*आजच्या दिवसाचा मुख्य उपक्रम 'विकास विद्यामंदिर, पाडळी' येथे पार पडला. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात कालच्या निबंध स्पर्धेचा निकाल घोषित करण्यात आला. विशेष म्हणजे, शाळेतील लहान मुलींनी सावित्रीबाईंच्या वेशभूषेत येऊन या क्रांतीज्योतीचा इतिहास जिवंत केला. स्वयंसेवकांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि शैक्षणिक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. केवळ पुरस्कार देणे हा उद्देश नसून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करणे हा यामागचा खरा हेतू होता.*

*दुपारच्या सत्रात स्वयंसेवकांनी पूर्णतः 'रक्तदान शिबिराच्या' पूर्वतयारीवर लक्ष केंद्रित केले. उद्या होणाऱ्या या मोठ्या उपक्रमासाठी स्वयंसेवकांच्या गटांनी संपूर्ण गावात पदयात्रा काढली. 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' या घोषणेसह घरोघरी जाऊन माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले. ग्रामस्थांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांना या जीवनरक्षक मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले. या जनजागृतीमुळे गावात सकारात्मक प्रतिसाद पाहायला मिळाला.*

*अशा प्रकारे, शैक्षणिक वारसा जपणे आणि उद्याच्या रक्तदान शिबिराचे नियोजन चोख पार पाडणे, अशा दुहेरी जबाबदारीने चौथ्या दिवसाची यशस्वी सांगता झाली.*















क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण


















*निबंध स्पर्धेमधील गुणवंताचा गौरव*

## राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विशेष श्रमसंस्कार शिबिर २०२५-२६

**अहवाल:** *दिवस पाचवा (भव्य रक्तदान शिबिर)*

**दिनांक:** *०४/०१/२०२६*

**स्थळ:** *मौजे पाडळी*

*राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचा पाचवा दिवस 'मानवता सेवा' या पवित्र हेतूने आणि एका विशेष सामाजिक उपक्रमाने संपन्न झाला. आजचा संपूर्ण दिवस* **'भव्य रक्तदान शिबिरा** *' साठी समर्पित करण्यात आला होता. दिवसाची सुरुवात सकाळी हनुमान मंदिर परिसराची स्वच्छता करून आणि 'NSS प्रतिज्ञा' घेऊन झाली. त्यानंतर सर्व स्वयंसेवकांनी शिबिराच्या नियोजनानुसार आपापल्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या.*

*हे रक्तदान शिबिर डी. वाय. पाटील हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, कोल्हापूर यांच्या सौजन्याने आणि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वयंसेवकांनी गेल्या काही दिवसांपासून जय्यत तयारी केली होती. सर्व स्वयंसेवकांनी आपल्या व्हॉट्सअ‍ॅप (WhatsApp) स्टेटसच्या माध्यमातून आणि महाविद्यालयात प्रत्यक्ष सूचना देऊन या मोहिमेची माहिती सर्वांपर्यंत पोहोचवली होती. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने पाडली गावात येऊन रक्तदान केले.*

*आजच्या या शिबिरातील सर्वात प्रेरणादायी क्षण म्हणजे, गावातील एका ६० ते ६५ वयोगटातील आजींनी स्वतःहून पुढे येत रक्तदान करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांचे हे धाडस आणि समाजसेवेची ओढ पाहून उपस्थित सर्व डॉक्टर, विद्यार्थी आणि ग्रामस्थ भारावून गेले. त्यांच्या या कृतीने "रक्तदानाला वयाचे बंधन नसते, तर सेवाभावी वृत्ती महत्त्वाची असते" हा मोलाचा संदेश सर्वांना दिला.*

*विशेष म्हणजे, केवळ विद्यार्थीच नव्हे, तर NSS च्या अनेक स्वयंसेवकांनीही स्वतः पुढाकार घेऊन रक्तदान केले. 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे स्वयंसेवकांनी स्वतःचे रक्त देऊन समाजासमोर एक उत्तम आदर्श उभा केला.*

*या रक्तदान शिबिरामुळे रक्ताच्या अनेक पिशव्यांचे संकलन करण्यात यश आले, ज्याचा उपयोग गरजू रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी केला जाणार आहे.*

*संध्याकाळच्या सत्रात रक्तदान शिबिर यशस्वीरित्या पार पडल्याबद्दल आनंद व्यक्त करण्यात आला आणि अशा प्रकारे सामाजिक बांधिलकी जपणारा पाचवा दिवस यशस्वीरित्या संपन्न झाला.*










*भव्य रक्तदान शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद*




भव्य रक्तदान शिबिरामध्ये योगदान देताना विद्यार्थी व ग्रामस्थ












*भव्य रक्तदान शिबिरामध्ये उपस्थित डी. वाय. पाटील हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, कोल्हापूर येथील टीम व विदयार्थी*

## राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विशेष श्रमसंस्कार शिबिर २०२५-२६

**अहवाल:** *दिवस सहावा (जलसंधारण आणि प्लास्टिक मुक्ती जनजागृती)*

**दिनांक**: *०५/०१/२०२६*

**स्थळ:** *मौजे पाडळी*

*राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचा सहावा दिवस निसर्ग संवर्धन आणि पर्यावरण रक्षणाच्या संकल्पाने संपन्न झाला. दिवसाची सुरुवात सकाळी हनुमान मंदिर परिसराची स्वच्छता करून आणि 'NSS प्रतिज्ञा' घेऊन झाली. आजचा दिवस प्रामुख्याने 'पाणी' आणि 'प्लास्टिक' या दोन गंभीर समस्यांवर जनजागृती करण्यासाठी समर्पित होता.*

*आजच्या दिवसाचे मुख्य सत्र 'जलसंधारण आणि पाणलोट व्यवस्थापन' (Watershed Management) या विषयावर आधारित होते. यासाठी पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक श्री. प्रशांत गवंडी सर, श्री. सुहास पाटील आणि श्री. अजय माने यांची प्रमुख उपस्थिती लाभली. गवंडी सरांनी "पाणी अडवा, पाणी जिरवा" या संकल्पनेवर भर देत, शास्त्रीय पद्धतीने जलसंधारण कसे करावे, याचे सखोल मार्गदर्शन ग्रामस्थांना आणि स्वयंसेवकांना केले. जमिनीचा पोत सुधारणे आणि भूगर्भातील पाणी पातळी वाढवणे काळाची गरज असल्याचे त्यांनी पटवून दिले. या सत्रासाठी महाविद्यालयाच्या प्रोफेसर ए. जी. माने मॅम आणि साबळे सर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना तांत्रिक माहिती दिली.*

*दुपारच्या सत्रात 'प्लास्टिक मुक्ती' या विषयावर विशेष अभियान राबवण्यात आले. स्वयंसेवकांनी आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे संपूर्ण गावातून एक भव्य प्रबोधन रॅली काढली. "प्लास्टिक हटाओ, पृथ्वी वाचवा", "प्लास्टिकमुक्त गाव, सुंदर गाव" अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. रॅलीच्या शेवटी गावातील मुख्य चौकात स्वयंसेवकांनी प्लास्टिकच्या अतिवापरामुळे होणाऱ्या घातक परिणामांवर एक प्रभावी 'पथनाट्य' सादर केले.*

*प्लास्टिकमुळे जमिनीची सुपीकता कशी नष्ट होते आणि प्राण्यांच्या जीवाला कसा धोका निर्माण होतो, हे या पथनाट्यातून अत्यंत सोप्या भाषेत मांडण्यात आले.*

*पथनाट्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष श्रमदान करून गावातील रस्त्यांच्या कडेला पडलेला कचरा आणि प्लास्टिक गोळा केले. अशा प्रकारे, जलजागृती आणि प्लास्टिक मुक्तीचा महत्त्वपूर्ण संदेश देऊन शिबिराचा सहावा दिवस यशस्वीरित्या संपन्न झाला.*











दिवसाची सुरुवात NSS गीताने व प्रतिज्ञेने




*"Paani Foundation"* मधील उपस्थित मान्यवरांचे स्वागत व मार्गदर्शन











"*Paani Foundation*" मधील तज्ञाकडून मार्गदर्शन व आभार











'प्लास्टिक मुक्ती' विषयी जनजागृती करताना पथनाट्य सादरीकरण

# राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विशेष श्रमसंस्कार शिबिर २०२५-२६

## अहवाल: दिवस सातवा(वृक्षारोपण आणि शिबीर समारोप)

## दिनांक: ०६/०१/२०२६

## स्थळ: मौजे पाडळी

*राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचा सातवा आणि शेवटचा दिवस 'पर्यावरण रक्षण' आणि 'कृतज्ञता' या भावनेने संपन्न झाला. शिबिराच्या शेवटच्या दिवशी निसर्गाप्रती आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी 'वृक्षारोपण' हा मुख्य उपक्रम राबवण्यात आला. दिवसाची सुरुवात सकाळी हनुमान मंदिर परिसराची स्वच्छता करून आणि सामूहिक प्रार्थनेने झाली.*

*आजच्या सत्रात केंद्र सरकारच्या 'एक पेड माँ के नाम' या विशेष संकल्पनेअंतर्गत वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर वाय. व्ही. शेटे सर आणि टेक्निकल ऑफिसर एस. एम. पाटील सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या मोहिमेअंतर्गत स्वयंसेवकांनी आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम गावाच्या वेशीवर आणि रस्त्यांच्या कडेला असलेला कचरा पूर्णपणे काढून परिसर स्वच्छ केला. त्यानंतर त्या जागी जांभूळ, चिंच आणि पिंपळ यांसारख्या भारतीय वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी शेटे सर आणि पाटील सरांनी स्वतः वृक्षारोपणात सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना झाडे लावण्याचे व ती जगवण्याचे महत्त्व पटवून दिले. तसेच स्थानिक ग्रंथालयाचे अध्यक्ष श्री. धनंजय पाटील सर यांचेही या मोहिमेत मोलाचे सहकार्य लाभले.*

*दुपारच्या सत्रात शिबिराचा औपचारिक समारोप सोहळा संपन्न झाला. या प्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक, सरपंच आणि महाविद्यालयाचे शिक्षक उपस्थित होते. गेल्या सात दिवसांत विद्यार्थ्यांनी पाडली गावात राबवलेल्या विविध उपक्रमांचा (स्वच्छता अभियान, व्यसनमुक्ती रॅली, सायबर सुरक्षा व्याख्यान, पाणी फाउंडेशन मार्गदर्शन, रक्तदान शिबिर आणि वृक्षारोपण) आढावा घेण्यात आला. ग्रामस्थांनी स्वयंसेवकांच्या कष्टाचे आणि शिस्तीचे मनापासून कौतुक केले.*

*शेवटी, सर्व स्वयंसेवकांनी सात दिवस सोबत घालवलेल्या आठवणींना उजाळा दिला. 'NSS' च्या घोषणांनी आणि राष्ट्रगीताने या अविस्मरणीय सात दिवसीय शिबिराची अधिकृत सांगता झाली. निरोप घेताना प्रत्येक स्वयंसेवकाच्या मनात समाजसेवेची एक वेगळीच जाणीव आणि समाधान निर्माण झाले होते.*











'एक पेड माँ के नाम' या विशेष संकल्पनेअंतर्गत वृक्षारोपण मोहीम











'एक पेड माँ के नाम' या वृक्षारोपण मोहिमेची क्षणचित्रे